**राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ**

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१३६/२०२३/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. प्रभाकर दौलतराव वाळके,<br>रा. मखमलाबाद रोड, गणेश नगर,<br>ड्रीम कॅसलजवळ, पंचवटी,<br>नाशिक, ता.जि.नाशिक-४२२००३. | नायब तहसिलदार,<br>उपविभागीय अधिकारी दिंडोरी<br>उपविभाग यांचे कार्यालय, दिंडोरी,<br>ता.दिंडोरी,जि.नाशिक-४२२२०२. | उपविभागीय अधिकारी,<br>उपविभागीय अधिकारी दिंडोरी<br>उपविभाग यांचे कार्यालय, दिंडोरी,<br>ता.दिडोरी, जि.नाशिक-४२२२०२. |

**सुनावणी दिनांक – १८/१२/२०२५**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०२/०१/२०२३

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : कोणतीही माहिती मिळाली नाही व प्रथम अपिल आदेश झाला नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०६/१०/२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०८/१०/२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : -----------

**(४ ) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**

**१)** मौजे खेडले, ता. दिंडोरी, ग. नं. २८ तुकडा विहीर अपेलंटचे वडीलोपार्जीत होती व आहे. नों.क्र. ७१५ आणेवारी दुरुस्तीचे इतर नावे खरेदी खतानुसार दुरुस्तीने कमी करणे आदेशान्वये मे. उ. वि. अधिकारी दिंडोरी/ आरटिएस/कावि/०९/२०१९ चे आदेशान्वये दुरुस्तीची मागणी होती व आहे.

**२)** कृष्णाजीची वारस नोंद मिळावी व वारसाचा युक्तीवाद नक्कल मिळावी.,

**३)** १९४७ ची खरेदीने कृष्णाजी रामचंद्र हे नाव पोकळीस्त असून सर्वे नंबर वाटपाअन्वये नोंद क्र. ३५० अन्वये १५/१ व १६/६ ४ आणे मिळकत वाटपाने असून कृष्णाजी नाव कमी करावे.,

**४)** १९९४ चे खरेदीने लक्ष्मण सिताराम वाळके नोंद क्र. ४२८ अन्वये खरेदीनुसार मिळकतीवर ग. नं. २९ वरील नोंद कमी करुन दुरुस्तीने ग. नं. २८ वर नो. क्र. ७१५ आणेवारी दुरुस्तीने लक्ष्मण

सिताराम हे नाव कमी करावे माहिती मिळावी. नि. ना. तहसिल, तलाठी/सर्कलचा अहवाल दुरुस्ती कामी असून माहिती मिळावी.

५) गट नं. २८ तुकडा विहीर ग. नं. २९ ची वडीलोपार्जीत वहीवाट आहे. इलेक्ट्रीक कनेक्शन गट नं. २८ वर अर्जदाराचेच असून समक्ष पहाणी करुन दुरुस्ती व्हावी. १९४७ चे २४/०३/४७ व १९९४ चे दि. १०/०५/९४ चे खरेदीखतान्वये कृष्णाजी हे नाव व लक्ष्मण हे नाव कमी व्हावेत.

६) मे. उ. वि. अधिकारी दिंडोरी/आरटीएस/केस क्र. ४८/२०२१ बाबत अपेलंट व सा. वाले यांचे युक्तीवाद दाखल असून अपेलंट व सा. वाले चे युक्तीवाद दाखल बाबत नक्कल मिळावी.

७) तहसिलदार दिंडोरी/क्र.अधि/अभी/फे.चौ/९०४/२०२० बाबत नोंद क्र. ७१५ आणेवारी दुरुस्तीने व १९४७ व १९९४ चे खरेदीने कृष्णाजी जोशी व लक्ष्मण सिताराम वाळके हे नाव नोंदणीकृत खरेदीने कमी करुन माहिती मिळावी.

८) नि. ना. तहसिलदार दिंडोरी /क्र. NLRMP/३१/२०२१ ची नोटीस चुकीचा गांवचा (करंजवण) उल्लेख करुन खरेदी नोटीस पाठविली ती रद्द करणे कामी तहसिलदार दिंडोरी दि. ०८/०४/२०२१ रोजी लेखी तक्रार दाखल माहिती मिळावी.

९) प्रांतधिकाऱ्याने हेतुत: चुकीचा आदेश केला आहे माहिती मिळावी. टिप- १९४७ चे व १९९४ चे नोंदणीकृत खरेदीखताने नोंद क्र. ३२३ व ४२८ ही नोंद असून नोंद क्र. ७१५ आणेवारी दुरुस्तीने गट नं. २८ वर दुरुस्ती मागणी आहे ही बाब दुर्लक्षीत झालेने प्रांत दिंडोरी अपिल/४८/२०२१ असून सामनेवाले गैरहजर माहिती मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उ. वि. अ. कार्यालय, दिंडोरी यांनी दि. २१/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस अर्जातील पहिल्या विषयाबाबत शुल्क भरणा करणेबाबत व इतर विषयांबाबत स्वतंत्र अर्ज दाखल करणेबाबत कळविले असल्याचे दिसून येते.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०७/११/२०२२

(२) प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०७/११/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, दिंडोरी यांनी दि. २४/११/२०२२ रोजी सुनावणी घेवून अर्जदार यांचा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अर्जदार यांना त्यांनी सदर नक्कल फी चे चलन उपलब्ध करुन दिल्यानंतर तात्काळ पुरविण्यात यावी, असे नमुद करुन प्रथम अपिल निकाली काढण्यात आल्याचे दिसून येते.

**५. युक्तीवाद -** सुनावणीवेळी उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उ. वि. अ. कार्यालय, दिंडोरी यांनी असे सांगितले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २१/१०/२०२२ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस शुल्क भरणा करणेबाबत कळविले आहे, परंतु अपिलार्थी यांनी शुल्क भरणा केलेला नाही.

**६. निष्कर्ष –**

१. अपिलार्थी यांनी माहिती अर्जामध्ये माहितीचा कालावधी स्पष्टपणे नमुद केलेला नसल्याने माहितीचा अर्ज मोघम स्वरुपाचा ठरतो.

२. अपिलार्थीने केलेल्या माहिती अर्जासंदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उ. वि. अ. कार्यालय, दिंडोरी यांनी दि. २१/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती शुल्क भरणा करणेबाबत कळविले असल्याचे दिसून येते.

३. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, दिंडोरी यांनी प्रथम अपिल अर्जावर दि. २४/११/२०२२ रोजी सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे दिसून येते.

४. अपिलार्थी यांनी शुल्क भरणा केलेला नसल्याने प्रथम अपिल अर्ज व द्वितीय अपिल अर्ज देखील दाखल पात्र होत नाही.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक १३६/२०२३/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र. १८७३० 10 MAR 2026